# स्वयंरोजगार - स्वावलंबी व्हा !

**पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम**

जें द्र शासनाच्या पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांर्तगंत स्वतःचा ग्रामीण व शहरी भागात नवीन उद्योग /प्रज् ल्प सुरु ज् रण्यासाठी राष्ट्रीयकृत व मान्यताप्राप्त बँकेमार्फत आर्थिक सहाय्य मिळु शजे ल.

**पात्रता :**

१. वयोमर्यादा : १८ वर्षापेक्षा जास्त

२. शिजज : कर्ज मर्यादा रु १० लाखा उत्पादनासाठी व सेवाउद्योगासाठी ५ लाख पर्यत शिक्षणाची

३. अट नाही उत्पादनासाठी कर्ज मर्यादा रु १० लाखा वरील व सेवा उद्योगासाठी ५ लाज वरील कर्ज मागणीसाठी शिक्षजाची अट किमान ८ वी पास असणे आवश्यक आहे.

४. उत्पन्न : उत्पन्नाची अट नाही.

५. स्वयंसहाय्यता बचत गट : नोंदणीकृत संस्थांचे नवीन उद्योगांनाही कर्ज मिळू शकेल.

६. शासनाचे अनुदान घेतलेला लाभार्थी सदरील योजनेअंतर्गत पात्र नाही.

**ठळक वैशिष्यये :**

१. प्रकल्प किंमत : उद्योगासाठी २५.०० लक्ष पर्यंत सेवा उद्योगासाठी १०.०० लक्ष रु.पर्यंत

२. अनुदान : अ) सर्वसाधारण लाभार्थीसाठी शहरीभागात १५% व ग्रामीण भागात २५% अनुदान.
ब) अनुसुचीत जाती/जमाती/इतर मागासवर्गीय, अल्पसंख्यांक/महिला/माजी सैनिक/अपंग या विशेष प्रवर्गासाठी शहरीभागात २५% व ग्रामीण भागात ३५% अनुदान.

३. लाभार्थी सहभाज : सर्वसाधारज लाभार्थी १०%
विशेष प्रवर्गासाठी ५%

४. बँक कर्ज : सर्वसाधारज लाभार्थी ९०%
विशेष प्रवर्गासाठी ९५%

५. प्रशिजज : कर्ज मंजूरीसाठी २ आठवडयाचे प्रशिक्षण दिल्यानंतरच कर्ज वितरण करण्यात येते. ज्यांनी अगोदरच असे प्रशिक्षण घेतले असल्यास कर्ज मंजूरीनंतरच्या प्रशिक्षणातून सुट देण्यात येते.

६. नकारात्मक उद्योगाची यादी: ज़ृ षी अधारित व कृषी पुरक उद्योग,मांसाहार,मद्य,बीडी,सिगारेट,पान,तंबाखु,संबंधी उद्योग, २० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पॉलीथीन बॅग, प्लास्टीक रिसायकलींग उद्योग, खादी ग्रामोद्योग कार्यक्रमांतर्गत रिबेट घेणारे उद्योग व ग्रामीण वाहतूक व्यवसाय या योजनेअंतर्गत पात्र नाहीत.

# जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना

**वैशिष्टये :**

१. शिक्षणाची व वयाची अट नाही.
२. या योजनेत उद्योग व सेवा उद्योग (ट्रक,रिक्षा,टेम्पो व हॉटेल सोडुन इतर सेवा उद्योग) यासाठी कर्ज मिळू शकते.
३. योजनेत यंत्रसामुग्रीमधील एकूण गुंतवणुक रु. २ लाखाच्या आत असावी.
४. ही योजना १९८१ नुसार १ लाखापर्यंत लोकसंख्या असलेल्या गावात/ग्रामीण भागात लागु आहे.
५. योजनेखाली उद्योग व सेवा तसेच अस्तित्वात असलेल्या लघुउद्योगाच्या वाढीसाठी अर्ज करता येतो.
६. अर्ज ७५ टक्के कर्ज मिळण्यासाठी वित्तीय संस्थेकडे (राष्ट्रीय बँका, व्यापारी बँका व व्यापारी सहकारी बँ ा) पाठविण्यात येतो.
७. एकूण प्रकल्प खर्चाच्या सर्वसाधारण घटकांना २०% प्रमाणे रु. ४०,००० पर्यंत व अनु.जाती/जमातीसाठी ३०%प्रमाणे रु.६०,००० पर्यंत मार्जीन मनीवर ४% व्याज दराने मिळेल व ते पाच वर्षात परतफेड करावयाचे आहे.

# सुशिक्षित बेरोजगारासाठी बीजभांडवल कर्ज योजना

**पात्रताः**

१. अर्जदार किमान ७ वी पास असावा.
२. वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे
३. उमेदवार बेरोजगार असावा.
४. उमेदवाराचे महाराष्ट्रात पंधरा वर्षे वास्तव्य असावे.

**ठळक वैशिष्टये :**

१. योजनेत पात्र उद्योग/व्यसायाच्या प्रकल्प खर्चाची कमाल मर्यादा रु.२५ लाख राहील व त्यात एकूण स्थिर भांडवली गुंतवणुक व खेळत्या भांडवलाचे सीमांतिक भांडवल अंर्तभूत राहील.
२. बीज भांडवल १५% प्रमाणे जास्तीत जास्त रु.३ लाख ७५ हजार रु पर्यत
३. दहा लाख रुपयापेक्षा कमी प्रकल्प खर्च असलेल्या प्रकल्पांमध्ये अनुसूचित जाती/जमाती/इतर मागासवर्गीय/ अपंग/ भटक्या/विमुक्तजाती जमातीसाठी बीज भांडवल प्रकल्पाचे २० % अनुज्ञेय राहील.
४. ज र्जपेड,कर्ज दिल्यानंतर व्यापर व सेवा उद्योगासाठी ६ महिन्यांचा विलंब अवधी-ंतर ६ महिन्यापासून ४.५ वर्षापर्यत व लघु उद्योगासाठी ३ वर्षाच्या विलंब अवधीनंतर ३ ते ७ वर्षात ५ हप्त्यात परतफेड करावी.
५. बीज भांडवल कर्जासाठी व्याजाचा दर द.सा.द.शे ६ % असून नियमीत परतफेड करणा-या लाभार्थीस ३ % सवलत देण्यात येईल व थज बाकीदारास १ % दंड व्याज आकारण्यांत येईल.
६. बीज भांडवल कर्जाच्या गैरवापर करणा-यास २% दंड लावून एक रकमी वसूली करण्यांत यईल. थकीत बीज भांडवल वसूलीसाठी कार्यवाही करण्यांत येईल.
७. बीज भांडवल कर्ज मंजुरीनंतर जिल्हा उद्योग केंद्राचे नावे दुसरा अधिभार नोंदणी आवश्यक

# सर्व योजनांसाठी सर्व साधारण कागदपत्राची यादी

१. विहित नमुन्यातील अर्ज
२. पासपोर्ट साईज फोटो.
३. वयाचे प्रमाणपत्र (जन्मदाखला/ शाळा सोडल्याचा दाखला)
४. शैक्षणिक तांत्रिक पात्रतेसाठी प्रमाणपत्र
५. रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाचे -नोंदजीपत्र.
६. विहित नमुन्यातील शपथपत्र.
७. शिधावाटप/ तहसीलदार /गटविकास अधिकारी यांचा रहिवासी दाखला.
८. दुग्ध व्यवसायासाठी डेअरीचे हमीपत्र,वाहनासाठी आर.टी.ओ. परवाना इतर उद्योग व्यवसायासाठी आवश्यक ते परवा-ने.
९. अपंग,माजी सौनिज /अनु.जाती /जमातींपैकी असल्यास आवश्यकते प्रमाणपत्रे.
१०. यंत्रसामुग्री /फर्निचर /मालाचे दरपत्रज .
११. उद्योग व्यवसाय सुरु करावयाचे जागेचे भाडेपत्र/संमतीपत्र /मालकी पत्र
१२. प्रकल्प अहवाल
१३. उद्योग /व्यवयासास लागणारे आवश्यक परवाने.

# जालना जिल्हयात वाव असणा-या संभाव्य उद्योगाची यादी

- ❖ ज़ृषी आधारित व अन्न प्रक्रिया उद्योग : दालमिल, ऑईल मिल ,मुरमुरे उत्पादन,गुळ उद्योग,क्‍ोल्डस्टोअरेज, दरळवा,खारे शेंगदाणे ,रवा मैदाआटा उत्पादन,फळ प्रक्रिया ,जॅम,जेली,लोणचे,ड्रायफ्रुटस,उपपदार्थ, सॉफ्ट ड्रिंक्स,पेयजल,सोया प्रोडक्टस,मसाले,पापड,पॉपकॉर्न,पशुखाद्ये,जैवतंत्रज्ञशन उद्योग ,बेकरी इत्यादी.
- ❖ अभियंत्रिकी उद्योग :- स्टील फॅब्रीकेशन,स्टील,लाकडी,प्लॅस्टीक फर्निचर,कृषी अवजारे,गेटस् जिल,फ्रेम,रोलींग शटर,बायडींग वायर,खिळे,बारबड वायर खेळण्या,बॅटरी उत्पादन,ॲटोफिल्टर,रेडीयेटर, वाहनाचे ॲक्सेसरीज व स्पेअरपार्टस,पिव्हिसी पाईप्स,सिमेंट पाईप्स,सोन्याचे व चांदिचे दागीने तयार करणे.
- ❖ रसायन उद्योग :- अगरबत्ती,भांडी,कुंकु,डिस्पेंटर,मेणबत्ती,अत्तर,फिनेल,निळ,रबर बॅन्ड,हर्बल प्रॉडक्टस् , औषधी उत्पादने,डिटर्जेट पावडर, साबण,ऑफीस गम,पेस्ट इत्यादी.
- ❖ पेपर व प्रिन्टींग उद्योग :- हस्तकागद,ग्रे बोर्ड,कोरुगेटेड बॉक्सेस,पेपर नॅपकीन, फाईल कव्हर, ज्‍ॉम्युटर पेपर, वहया,रजीस्टर,ऑफसेट प्रिंन्टींग डिटीपी, आयटी उद्योग, बायडींग इत्यादी.
- ❖ सेवा उद्योग :- पिठाणी जिरजी,झेरॉक्स,हेल्थक्लब,लॉड्री,कॅटरींग सिडी कॅसेट,ॲटो रिपेअरॲन्ड सर्व्हिसेस, फोटोग्राफी,हॉटेल,दवाखाना,केबल सेवा ,मंगल सेवा,टेस्टींग लॅब,कॉप्युटर, टि व्ही, मोबाईल,फोन तसेच इलेक्ल्ट्रीक व इलेक्ट्रॉनिक्स दरुस्ती, वाहतूक, कम्युनिकेशन कॉलसेंन्टर इत्यादी.
- ❖ इतर उद्योग :-रेडिमेड गारमेंन्टस, होजिअरी, विणकाम,पर्स व बॅग बनविणे, सिट कव्हर ,पादपात्रे उत्पादन, कुक्कुट पालन,दुग्ध व्यवसाय ,वराहपालन , हॅचरी,शहामृगपालन ,वीट, टाईल्स,बांधकाम साहित्य.

# सामुहिक प्रोत्साहन योजना -२०१३

औद्योगिक दुष्टया अविकसित व विकसनशी भागात ,मोठया प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक व्हावी या उद्येशाने महाराष्ट्र शासनाने १ एप्रिल २०१३ पासून सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंमलात आणली आहे. वैयक्तीक भागीदारी ,खाजगी क्षेत्र,राज्यस्तरावरील सार्वजनिक संस्था /संयुक्त क्षेत्रे आणि सहकारी क्षेत्रात अलेले लघुउद्योग घटक १.०४.२०१३ ते ३१.०३.२०१८ पर्यत परिणामकारक टप्पे पूर्ण करुन अर्ज सादर करावयाचे आहेत शासनाने तालुक्याची त्यांच्या औद्योगिक विकासाच्या प्रतवारीनुसार अ,ब,क,ड,ड+ आणि विना उद्योग जिल्हा अशा सहा गटात विभागणी करण्यात आली आहे.जालना जिल्हयातील सर्व तालुक्यांचा समावेश ड + वर्गवारीत करण्यात आलेले आहे. या योजने अंतर्गत ज्या उद्योग घटकांना पात्रता प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. त्यामध्ये मंजूर झालेल्या अनुदान १० वर्षात १० टप्प्यामध्ये औद्योगिक प्रचलन अनुदान दरवर्षी उद्योगाने,राज्य शासनास किंवा शासनाच्या विभागास यंत्रणेस भरलेल्या करातून वितरीत करण्यात येजार आहेत.

| ***अ.□*** | ***उद्योगाची वर्गवारी*** | ***अनुदान पात्र %*** | ***□लावधी*** |
|---|---|---|---|
| ***१.*** | ***सुक्ष्म व लघु व मध्यम उद्योग*** | ***८० %*** | ***१० वर्षे*** |
| ***२*** | ***मोठे उद्योग*** | ***५० %*** | ***७ वर्षे*** |

या शिवाय खालील प्रोत्साहने सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत देण्यात येणार आहेत.

१. अन्न प्रक्रिया उद्योगावर भर देण्याच्या दृष्टीकोणातून वरील तकत्यात दर्शविलेल्या भांडवली गुंतवणूकीच्या टक्केवारीत दयावयाच्या प्रोत्साहनाच्या आर्थिक मर्यादेपेक्षा अजिरिक्त १० टक्के औद्योगिक विकास अनुदान देण्यात येईल आणी पात्रता कालावधीत १ वर्षाची वाढ करण्यांत येईल
२. उद्योग घटकाचे उत्पादन सुरु झाल्याचे दिनांकापासून विद्यूत शुल्क १५ वर्षासाठी पूर्णपणे माफ व -विन पात्र उद्योज घटकांना विद्यूत देयकापोटी रु. १ प्रती युनिट या दराने उत्पादनाच्या दिनांकापासून ३ वर्षासाठी अनुदान देणे अनुज्ञेय राहील.
३. १.४.२०१३ ते ३१.०३.२०१८ या कालावधीमध्ये उद्योग उभारणीसाठी अभिहस्तांतरण ,तारणगहाण, भाडेपटटा वगैरेसाठी मुद्रांक शुल्क माफ.
४. तांत्रिक आधुनिकीकरणासाठी केलेल्या गुंतवणूकीच्या ५ टक्के प्रमाणे जास्तीत तास्त रु २५ लक्ष अनुदान
५. जुणवत्ता प्रमाणपत्राच्या खर्चाच्या ५० % जास्तीत जास्त एक लक्ष अनुदान

६. प्रदुषणमुक्त उत्पादनासाठी २५% जास्तीत जास्त ५ लक्ष अनुदान
७. पेटेट नोंदणीसाठी खर्चाच्या ५० % जास्तीत जास्त ५ लक्ष अनुदान
८. पात्र उद्योग घटकाच्या ऊर्जा लेखा परिक्षण ( ऑडिट ) व पाणी लेखा परिक्षणासाठी ( ऑडिट) झालेल्या एकूण खर्चाच्या ७५% व जास्तीत जास्त अनुक्रमे रु २.०० लाख व रु १.०० लाख इतका परतावा अनुज्ञेय राहील तसेच वीज आणि पाणी बचत करण्याच्या संदर्भात उद्योग घटकाने खरेदी केलेल्या यंत्रसामुग्रीच्या किमतीच्या ५० % व जास्तीत जास्त प्रत्येकी रु ५.०० लाख इतक्या मर्यादेपर्यत परतावा अनुदान अनुज्ञेय राहील.
९. पात्र उद्योग घटकांना पात्रता कालावधीसाठी त्यांनी स्थिर भांडवली मालकत्ता संपादन करण्या करिता घेतलेल्या मुदत कर्जावर ५ % पर्यत व्याज अनुदान त्या त्या वर्षासाठी वापरलेल्या व भरलेल्या वीज देयकाच्या रक्कमेच्या मर्यादेपर्यत देय राहील.

## *लघु उद्योग नोंदणी*

एमएसएमईडी कायदा २००६ अंतर्गत उद्योगगासाठी ज्ञापन स्विकृतीचा कालावधी २.१०.२००६ पासून लागू करण्यांत आला आहे सदर कायद्याअंतर्गत खालीलप्रमाणे यंत्रसामुग्री गुंतवणूाप्रमाजे ज्ञापन स्विकृती देण्यात येईल.

| अ.क्रं. | उद्योगाचे वर्गीकरण | उद्योगाचे स्वरुप व यंत्रसामुग्री गुंतवणूक मर्यादा | |
|---|---|---|---|
| | | उत्पादक उद्योग | सेवा उद्योग |
| १ | सुक्ष्म उद्योग | रु २५ लाखापर्यत | रु.१० लाजा पर्यत |
| २ | लघु उद्योग | रु २५ लाख ते रु ५ कोटी | रु १० लाख ते रु २ कोटी |
| ३ | मध्यम उद्योग | रु ५ कोटी ते रु १० कोटी | रु २ कोटी ते रु ५ कोटी |

सदर स्विकृती दोन प्रकारची असून प्रस्तावित उद्योग घटकांना भाग १ मध्ये स्विकृती देण्यात येईल व त्याचे वैधता २ वर्षे राहिल. उत्पादनात असलेल्या उद्योग घटकांना भाग २ मध्ये स्विकृती देण्यात येईल. सदर नोंदणी (स्विकृती ) प्रमाणपत्रावर राज्य व केंद्र शासनाचे सर्व सोयी /सवलती मिळतील

# लघुउद्योग घटकांना जिल्हा पुरस्कार

लघुउद्योग घटकाच्या उत्पादनांचा दर्जा उत्तम राहावा व स्पर्धात्मक वातावरण निर्मितीच्या दृष्टीने राज्य शासनातर्फे उत्कुष्ट उघुउद्योग घटकांची निवड करुन पुरस्कार दिल जातात. पात्र उद्योजकांनी विहित नमुन्यात अर्ज करावयाचे असतात अर्जाचा नमुना जिल्हा उद्योग केंद्राच्या कार्यालयात विनामुल्य दिला जातो. **प्रथम पुरस्ज ार रु १५,०००/-** रोख गौरव चिन्ह व शाल.**द्वितीय पुरस्कार १०,०००/-** रोख गौरव चिन्ह व शाल देवून यथेचित सत्कार करण्यात येतो.

**पात्रता :-** **१.**अर्जाचे वेळी स्थायी लघुउद्योग नोंदणी ही ३ वर्षाच्या पूर्वीची असावी.

२. कमीत कमी सतत मगील दोन वर्षापासून उत्पादन चालु असावे.

३. वित्तिय संस्थेचे थकबाकीदार नसावे.

**जिल्हा उद्योग मित्र (झूम )**

मा. जिल्हाधिकारी याचे अध्यक्षतेखाली हया समितीची सभा घेतली जाते हया सभेत उद्योजकांचे अडीअडचणीाबाबत सविस्तर चर्चा होवून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. त्याकरिता उद्योजकाने त्यांचे अडचणीबाबत तपशील देवून जिल्हा उद्योग केंद्राकडे लेखी निवेदन दिले पाहिजे

# ज ार्यालय महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र जालना

| अ.क्र | अधिकारी / कर्मचारी यांचे नांव | पद-नाम | |
|---|---|---|---|
| १. | श्री.के.व्हि.जाधव | व्यवस्थापज | |
| २ | श्री.एस.के.घोडे | उद्योग निरिक्षक (नि.श्रे) | प्रतिनियुक्ती जिल्हा उद्योग कंद्र परभणी |
| ३ | श्री.जी.यू.पवार | उद्योग निरिक्षक | |
| ४ | श्री.एफ.के.शेख | उद्योग निरिक्षक | |
| ५ | श्री.डी.एन चक्रवर्ती | उद्योग निरिक्षक | |
| ६ | श्री.डी.आर.भगुरे | उद्योग निरिक्षक | |
| ७ | श्री.आर.के.जाधव | शाजा प्रमुज | |
| ८ | श्रीमती ए.व्हि.ठाकूर | टिपणी सहायक | |
| ९ | श्री .के.एच बेडवाल | लिपिज -नि-टंकलेखक | |
| १० | श्री.एस.के.कुलकर्णी | शिपाई | |
| ११ | श्री.एस.एस.माळी | शिपई | |
| १२ | श्री.आर.एस.तुपे | वाहन चालक | |
| १३ | श्री.आर.एम.सातदिवे | शिपाई -नि-पहारेज री | |